जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-07/2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 31.07.2019

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**सर्वसाधारण सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) च्र प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार **मा. महापौर, सौ. धबाले दिक्षा कपिल,** यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा **दिनांक 08.08.2019 रोजी दुपारी 12.00 वाजता नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजीत केली आहे.**

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**

**(मा. महापौर यांच्या मान्यतेने)** **(स. अजीतपालसिंघ संधु)**

**नगरसचिव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**प्रति**

**श्री/श्रीमती -------------------------------**

**सदस्य /सदस्या,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय क्रं. 01**

का.आ.क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/18694/19 दिनांक 27.03.19 अन्वये, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. निमवा/2018/प्र.क्रं.252/सेवा-4 दिनांक 17 ऑक्टोंबर 2018 नुसार मनपाकेतील निवृत्ती वेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर महा. भत्याची वाढ रोखीने अदाई करण्यात येत आहे. दि. 29 ऑक्टोंबर-18 चे शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावर दि. 01 जाने-18 ते 30 सप्टेंबर-18 या कालावधीतील 142% या दराने महागाई वाढीची रक्कम रोखीने अदाई करण्याची सदरील आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली सदरील आदेशास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेसाठी मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 02**

का.आ.क्रं. नावाशमनपा/लेवि/सेनि/18695/19 दिनांक 27.03.19 अन्वये, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. निमवा/2018/प्र.क्रं.252/सेवा-4 दिनांक 17 ऑक्टोंबर 2018 नुसार मनपाकेतील निवृत्ती वेतनधारक / कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांचे निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतनावर भत्याची वाढ रोखीने अदाई करण्यात येत आहे. दि. 29 ऑक्टोंबर-18 चे शासन निर्णयानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनावर दि. 01 जाने-18 ते 30 सप्टेंबर-18 या कालावधीतील 274% या दराने महागाई वाढीची रक्कम रोखीने अदाई करण्याची सदरील आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली सदरील आदेशास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक देणे बाबत.

**विषय क्रं. 03**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/3404/19 दिनांक 09.07.2019 नुसार शासन निर्णय क्रं. मभवा-1319/प्रक्र.13/सेवा-9 दि. 08 जुलै-2019 अन्वये सुधारीत दराने महागाई भत्ता मनपाकेतील कार्यरत वेतनधानकांना दिनांक 01 जुलै 19 पासुन मुळ वेतन व ग्रेडवेतन यावर 154% दराने महागाई भत्ता लागु करण्याची प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात आली त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 04**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/3403/19 दि. 09.07.19 अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-1319/प्र.क्र.13/सेवा-9/ दिनांक 8 जुलै-19 नुसार दिनांक 01 जाने-19 पासुन 7वा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेयमहागाई भत्या मनपाकेतील प्रतिनियुक्ती अधिकारी वेतनधारकांना दिनांक 01 जुलै-19 पासुन मुळ वेतनावर 12% दराने महागाई भत्ता लागु करण्याची प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 05**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडचा वित्तय वर्ष 2013-14 चा स्थानिक निधी लेखापरिक्षा (मनपालेप) औरंगाबाद यांचा अलेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाला असून सदरील अहवालास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 107 (अ) नुसार सदर लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करेल त्यानंतर आयुक्त मनपा महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार अहवालावर पुढील आवश्यक्ती कार्यवाही करेल असे नमुद आहे. त्यामुळे सदर लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर करुन मान्यता प्राप्त करुन तदनंतर अवालावर आवश्यक्ती पुढील कार्यवाही करण्याच्या मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.**(सुलभ संदर्भासाठी अहवालाची प्रत)**

**विषय क्रं. 06**

स्थानिक निधी लेखापरिक्षा (मनपालेप), उपविभाग-3 औरंगाबाद यांचे मार्फत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका लेखापरिक्षण अहवाल 2014-15 प्राप्त झाला असून सदरील अहवालास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 107 (अ) अन्वये सदर लेखापरिक्षण अहवाल महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची तरतुद आहे. त्यानंतर आयुक्त महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम यातील तरतुदीनुसार अहवालावर आवश्यकती पुढील कार्यवाही करील, असे नमुद आहे त्यामुळे सदर लेखापरिक्षण अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर करुन मान्यतेसाठी सादर तदनंतर अवालावर आवश्यक्ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. **(सुलभ संदर्भासाठी अहवालाची प्रत)**

**विषय क्रं. 07**

मा. आयुक्त नावाशमनपा नांदेड यांचे पत्र यांचे पत्र दिनांक 29.11.18 नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामपा-2019/प्र.क्र.79/ नवि-24 दिनांक 01 एप्रिल 2019 अन्वये खालील प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 85 दिनांक 12.10.2018 विखंडीत करण्यासाठी केलेल्या शिफारशीनुसार प्रथमतः निलंबीत करण्यात येत असुन त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्रं. 08**

मा. आयुक्त नावाशमनपा नांदेड यांचे पत्र दि. 06.12.2017 नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. नामनपा-2017/प्र.क्र.401/नवि-24/ दिनांक 14 जुन 2019 अन्वये खालील प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने समंत केलेला ठराव क्रं. 40 दिनांक 29.05.17 विखंडीत करण्यासाठी केलेल्या शिफारशीनुसार प्रथमतः निलंबित करण्यात येत असुन त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्रं. 09**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीने ठराव क्रं. 06 दिनांक 10.06.2019 व्दारे खालील प्रमाणे महासभेस शिफारस केलेली आहे त्यास मान्यता देणे बाबत**

मनपा हद्यीतील हैदरबाग येथील रुग्णालयात बालकांसाठी एक अतिदक्षता विभाग NICU स्थापन करणे आवश्यक आहे. सदरील अतिदक्षता विभाग स्थापन करण्यासाठी वैद्यकिय अधिकारी, नर्स, लॅब टेक्नीशीयन, वार्ड बॉय, चतुर्थश्रेणी कर्मचारी व इतर कर्मचारी वर्ग यांची कंत्राटी पध्दतीने व एकत्रीत वेतनावरील नियुक्ती करण्यासाठी शासनाची मान्यता प्राप्त करुन घेण्यात यावी. तसेच सदरील अतिदक्षता विभाग स्थापन करण्यासाठी लागणा-या खर्चास शासनाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी हि मनपा पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, महिला व बालकल्याण समितीची सभा सर्वानुमते महासभेस शिफारस करते.

**विषय क्रं. 10**

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्रं. 2017/मशाका-2/जमीन/टे-2/सीआर-26 दिनांक 15.12.2018 अन्वये श्री रविराज फल्ले, उपसचिव महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांनी पत्र क्रं. जमीन-2017/प्र.क्र.399/ज-7 अ, दिनांक 13.12.2018 अन्वये मा. विभागीय आयुक्त कार्यालयाचे पत्र दिनांक 14.11.2018 अन्वये LIGO प्रोजेक्टसाठी मौ. वसरणी ता.जि. नांदेड येथील ग.क्रं. 24 मधील शासकीय जमीन क्षेत्र 1.50 हे.आर. जमीन प्रदान बाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला असुन सदरील प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता खालील मुद्दयांच्या स्पष्टीकरणासह सादर करणेबाबत या कार्यालयास प्रत पाठवुन कळविले आहे.

त्या अनुषंगाने मौ. वसरणी ता.जि. नांदेड येथील ग.क्रं. 24 मधील शासकीय जमीन क्षेत्र 1.50 हे.आर. जमीन केंद्र सरकारच्या अणू उर्जा विभागास प्रदान करण्याच्या अनुषंगाने नावाशमनपा नांदेड कार्यालयाचे शिफारस पत्र सादर करण्यास कळविले आहे. उक्त गायरान जमीन ही नावाशमनपाकेच्या हद्यीतील असल्यामुळे या कार्यालया मार्फत शिफारस देण्याकरिता नावाशमनपा सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव व निर्णयास्तव सादर.

**विषय क्रं. 11**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत गुरु-ता-गद्दी सोहळा तसेच जेएनएनयुआरएम अंतर्गत रस्त्याचे विकास करण्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जागेचे भुसंपादन प्रस्ताव व प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांची तात्पुरती एकत्रीत मानधनावर नियुक्ती केलेली होती. सध्या भुसंपादन विभागात विशेष कार्यसन अधिकारी म्हणुन कार्यरत असलेले सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी श्री आर.एच. डोईजड यांच्या सेवेस दिनांक 31.12.18 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.19 ते 29.06.19 या कालावधीपर्यंत विशेष बाब म्हणुन मुदतवाढ देणेसाठी मानधन तत्वावर प्रतिमहा रुपये 15,000/- नियुक्ती करण्यास मान्यता देणे बाबत.

**विषय क्रं. 12**

भारत निवडणुक आयोग मार्फत 01.01.19 या अर्हता दिनांकावर मतदार यादी संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम निश्चित केल्यानुसार आयोगाकडून निर्देश असल्यामुळे हा विषय मनपाकेच्यासभेत चर्चेला ठेवुन सर्व सदस्यांना कार्यक्रमाची माहिती देणे.

उक्त कार्यक्रमाअंतर्गत मतदारांची 100% नोंदणी करणे बाबत जनजागृती करणे तसेच मतदारांच्या वगळणी, सुधारणा व आक्षेप असल्यास मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे विहीत मुदतीत अर्ज सादर करणेसाठी आपल्या प्रभागात सुचना देण्यासाठी कळविणे.

**विषय क्रं. 13**

उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक 22 जुन 2017 अन्वये महानगरपालिका कार्यालयाचे उर्जा परिक्षण करणे तसेच उर्जा संवर्धन करण्यासाठी योग्य ती तांत्रीक उपाय योजना करणे गरजेचे आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील विधुत व्यवस्थे मध्ये तांत्रिक उपायोजना साठी तयार करण्यात आलेल्या प्रकल्प अहवालानुसार लागणारा खर्च रुपये 35 लक्ष अर्थसहाय्य महाउर्जा कडुन प्राप्त होणार आहे सदर प्रकल्प राबविल्यास सुमारे 30% उर्जा बचत होऊ शकते. सदरील योजने अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीचा समावेश करणेसाठी महाऊर्जाकडे ही मनपाकेची सर्वसाधारण सभा सर्वानुमते शिफारस करते.

**<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>**

**विषय क्रं. 14** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. 02 मध्ये मुस्लीम व बौध्द या अल्पसंख्यांक समाजाची लोकवस्ती जास्तीत जास्त प्रमाणात असल्यामुळे व या प्रभागात नव्यानेच मुस्लीम समाजाची वस्ती वाढत असल्यामुळे या प्रभागातील खालील नगरे अल्पसंख्यांक म्हणुन घोषित करुन या नगरांमध्ये प्राथमिक गरजा, मुलभुत सोई सुविधा पुरविणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे शासन निर्णयाच्या दिशा निर्देशानुसार व वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार या प्रभागात अल्पसंख्याक समाजासाठी राखीव असलेल्या निधीतुन निधी देणे करिता हि सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. ज्योती मनिष कदम **अनुमोदक** :- सौ. संगिता सखाराम तुप्पेकर

**विषय क्रं. 15** **प्रस्ताव**

नांदेड शहराला योग्य प्रमाणात व नियमीत पाणीपरवठा करण्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे. शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पुढील काळात पाण्याची उणीव, टंचाई भासणार नाही. टँकरमुक्त शहर ही संकल्पना अमललात आणता येईल या करिता वॉटर ऑडिट करणे अत्यंत आवश्यक आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पातील 32 द.ल.घ.मी. पाणी व सागवी बंधरा, उर्ध्वपैनगंगा प्रकल्प (ईसापुर) कालव्यातील 15 दलघमी पाणी मनपाकेसाठी आरक्षीत आहे असे असेल तरी प्रत्यक्षात तेवढे पाणी आम्हाला मिळत नाही. बाष्पीभवन, गळती यामुळे पाण्याची तुट होते भविष्यात महापालिकेला आणखी पाण्याचा स्त्रोत वाढविण्यासाठी एखादी मोठी योजना तयार करावी लागेल या करिता वॉटर ऑडीट करुन अभ्यास करणे गरजेचे आहे. करिता ही सर्वसाधारण सभा वॉटर ऑडिट करण्यास मान्यता देते व हा प्रस्ताव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- बापूराव गजभारे **अनुमोदक** :- महेंद्र पिंपळे

**विषय क्रं. 16** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दी मध्ये रस्त्यावरील पथदिव्यांची देखभाल दुरुस्तीच्या कामा करिता देण्यात आलेले काम हे कंत्राटदाराकडून करण्यता येत असुन मागील एक वर्षाच्या कालावधी मध्ये संबंधीत कंत्राटदारा मार्फत मनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 12 (उमर कालोनी) प्रभागात पथदिव्यांच्या देखभाल दुरुसतीची किती व कोणत्या स्वरुपाची कामे करण्यात आली आहेत ? तसेच या प्रभागात किती पथदिवे नव्याने बसविण्यात आले आहेत ? सदर कामावर झालेला खर्च इ. सविस्तर माहिती संबंधीत अधिकारी / अभियंत्यांनी सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यास ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.

**सुचक** :- अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- अ. रशीद अ. गणी

**विषय क्रं. 17** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानरपालिके मार्फत जेएनएनयुआरएम, बिएसयुपी, स्ट्रॉमवॉटर, नगरोत्थान या योजने मार्फत शहरतील विकास कामे उत्कृष्ट दर्जाचे होण्यासाठी शासनाच्या सरळ सेवाभरती बाबतच्या प्रचलीत आदेशानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सुप्रिया मुलंगे, व्यंकटेश गोपिंचंद गोकुळे, शेख जैनोद्दीन हुसेन साब, महमंद जकीउल्ला खान, श्री सुर्यवंशी किरण नामदेवराव, स्वामी उत्तम गुरुनाथ, श्री सय्यद युनूस मैनोद्दीन, इत्यादी संबंधीताचे प्रतिमहा एकत्रीत वेतनावर कनिष्ट अभियंता म्हणुन नियुक्ती झालेली असुन सर्व संबंधीतांच्या एकत्रीत वेतनावरील सेवाकालावधी सलग 07 वर्षा पेक्षा जास्तीचा झालेला आहे. प्रस्तुत प्रकरणात मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबादच्या निर्देशानुसार कनिष्ट अभियंता या पदाच्या पदनिर्मितीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक क्रं. निभामपा/1106/29 /प्र.क्र.09/06/नवि-28 दिनांक 16.11.2006 च्या शासन परिपत्रकातील स्वयंस्पष्टता विचारात घेवुन सर्व संबंधीतांची एकत्रीत वेतनावरील सेवा नियमीत करणे बाबत.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- तिडके प्रशांत

**विषय क्रं. 18** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात महापालिके मार्फत नविन रस्ते, नाली बांधकाम, जुने रस्ते व नाली बांधकाम यासह दलीत वस्तजी सुधार योजना लहान व मध्यम शहराची एकात्मीक विकास योजना सुवर्ण जयंती शहारी रोजगार योजना, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम वाल्मीकी आंबेडकर आवास योजना या अंतर्गत होणा-या विकास कामाच्या देखभालीसाठी शासनाच्या सरळसेवा भरती बाबतच्या प्रचलीत आदेशानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 24.05.2006 रोजी ठराव क्रं. 39 व्दारे दिलेल्या मान्यतेनुसार श्री संदीप ज्ञानोबा पाटील, श्री ठाणेदार म. खिजूर म. मुस्तफा यांची महापालिका आस्थापनेवर प्रतिमहा एकत्रीत वेतनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक क्रं. निभामपा/1106/29 /प्र.क्र.09/06/नवि-28 दिनांक 16.11.06 च्या शासन परिपत्रकातील स्वयंस्पष्टता विचारात घेवुन आस्थापनेवरील रिक्त कनिष्ठ अभियंता या पदावर सेवा नियमीत करणे बाबत

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 19** **प्रस्ताव**

नावाशमनपाकेतील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील पंप ऑपरेटर म्हणुन 11 कर्मचारी कार्यरत आहेत.

तसेच एकूण 6 कंत्राटी पंप ऑपरेटर यांनी आस्थापनेवर सामावुन घेण्यासाठी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिकेतील दिलेल्या निर्देश/आदेश दिनांक 18.06.19 नुसार संबंधीतास रिक्त पदावर सामावुन घेण्यासाठी महासभेची व निवड समितीच्या मान्यतेने सामावुन घेणे तसेच संबंधीतांस सेवेतुन कमी करण्यात येवु नये असे आदेश पारीत केलेला आहे.

त्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवर मंजुर असलेल्या 36 पदांपैकी रिक्त असलेल्या 09 पदावर मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देश/आदेशानुसार वरील 09 कंत्राटी पंप ऑपरेटर कर्मचा-यांना वयाची अट शिथील करुन सेवेत आस्थापनेवर सामावुन घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

उर्वरीत कंत्राटी पंप ऑपरेटर कर्मचारी यांना भविष्यात रिक्त होणा-या पंप ऑपरेटर या पदावर वयाची अट शिथील करुन मनपा आस्थापनेवर सामावुन घेण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सुचक** :- राजेश लक्ष्मीनारायण यन्नम **अनुमोदक** :- सौ. गितांजली हाटकर (कापुरे)

**विषय क्रं. 20** **प्रस्ताव**

ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन विभागाचा शासन निर्णय क्रं. : जिपब-4817/प्र.क्र.522/आस्था-14 दिनांक 25 जुलै 2009 च्या शासन निर्णयान्वये राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका यांचे क्षेत्र वाढीमुळे या क्षेत्रात हस्तांतरीत होणा-या जिल्हा परिषदेच्या शाळा (मालमत्तेसह) हस्तांतरीत करण्याबबात निर्देशीत केलेले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात जिल्हा परिषद नांदेडच्या वतीने चालविण्यात येणा-या 32 प्राथमिक व 05 माध्यमिक शाळा चालविण्यात येतात सदर शाळा (मालमत्तेसह) मनपाकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सुचक** :- आनंद चव्हाण **अनुमोदक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले

**विषय क्रं. 21** **प्रस्ताव**

मा. अधिष्ठाता डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांनी कळविल्यानुसार संबंधीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपूरी यांकडील कचरा उचलणे कामी R&B Infra Project Pvt. Ltd यांना आदेशित करणे योग्य. R&B Infra Project Pvt. Ltd यांना सदरील कचरा उचलुन वाहतुकीव्दारे मनपा मालकीच्या डम्पिंग ग्राऊन्डवर नेऊन टाकणेसाठी मनपाकेने ठरविलेल्या कच-याचे दर प्रती टन रुपये 1,631/- आणि सदरील कचरा डम्पिंग ग्राऊन्डवर पोकलेन मशिनव्दारे सपाटीकरण, दबाई करणे इत्यादीसासठी प्रति टन रुपये 1,000/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 2,631/- प्रती टन डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांच्याकडुन वसुल करणे योग्य राहील.

**सुचक** :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक** :- आनंद चव्हाण

**विषय क्रं. 22** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर मनपा तर्फे हद्यीतील नागरीकांसाठी प्रामुख्याने गोरगरीब, दारिद्रय रेषेखालील, दलितवस्तीतील मोलमजुरी करणा-या नागरीकांना आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता एकूण 15 आरोग्य केंद्र (बाह्य रुग्णालय - ओ.पी.डी) कार्यान्वीत असून या ओपीडी मध्ये दररोज सकाळी 09 ते दुपारी 12.30 ऐवजी सकाळी 09 ते दुपारी 01 वाजेपर्यंत व दुपारी 04.30 ते सायंकाळी 06.00 वाजेपर्यंत करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सय्यद शोएब, पवळे उमेश, ज्योत्सना राजु गोडबोले **अनुमोदक** :- राजेश लक्ष्मीनारायण यन्नम, श्रीमती कौशल्या पुरी

**विषय क्रं. 23** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील आस्थापनेवर कार्यरत असलेले सहाय्यक आयुक्त श्री संजय नारायण जाधव यांची तत्कालीन वाघाळा नगरपालिकेत सालसन 1988 ला नेमणुक झालेली असुन आजपावेतो त्यांची या महानगरपालिकेतील सेवा 30 वर्षाच्या वर बजावलेली असुन संबंधीतांना अचानक **यकृताचा (LIVER)** त्रास होत होता. वैद्यकिय तपासणी केल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार **यकृत (LIVER)** बदलण्याशिवाय उपाय नसल्याचे कळविले होते. तदनंतर **यकृत** (LIVER) बदलण्यासाठी त्यांच्या घरातील सर्व कुंटूंब जसे पत्नी, मुलगा व मुलगी यांनी **यकृत** देण्यासाठी तयारी दर्शविली होती. कुटूंबांतील सर्व सदस्यांचे रक्तांची व इतर तपासण्यानंतर फक्त मुलगी कु. अंकीता संजय जाधव हीचेच यकृत जुळत असल्याचे डॉक्टरांनी सल्ला दिला. त्यानुसार कु. अंकीता संजय जाधव हीने आपल्या वडीलांना **यकृत** देवुन एक इतिहास निर्माण केला आहे. कु. अंकीता संजय जाधव हीच्या पासुन इतर मुलींनीही प्रेरणा घेणे आवश्यक आहे.

करिता कु. अंकीता संजय जाधव हीने आपले वडील श्री संजय जाधव सहाय्यक आयुक्त मनपा नांदेड यांना **यकृत** देवुन एका इतिहास निर्माण केल्यामुळे कु. अंकीताचा व त्यांच्या सर्व कुटूंबाचा महापालिके तर्फे सत्कार करुन हार्दिक अभिनंदन करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** सौ. सरीता बालाजीराव बिरकले, सौ. कविता संतोष मुळे, कु. अर्शिया कौसर महमंद हबीब.

**अनुमोदक :-** सौ. संगिता विठ्ठल पा. डक, सौ. ज्योती किशनराव कल्याणकर, सौ. सुनंदा संभाष पाटील,
सौ. संगिता सखराम तुप्पेकर, सौ. ज्योती मनिष कदम, सौ. जयश्री निलेश पावडे.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**